स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (महाराष्ट्र)

संशोधनासाठी निवडलेला विषय

लातूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्या : एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
वाणिज्य शाखेअंतर्गत वाणिज्य विषयातील पीएच.डी. साठी. प्रस्तूत करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

श्री नरेंद्र रमाकांत चोले

मार्गदर्शक

डॉ.पी.डी. शेळके
सहाय्यक प्राध्यापक, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर
जि.लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

शैक्षणिक वर्ष

मार्च २०२२

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१	मुखपृष्ठ	-
२	अनुक्रमणिका	१
३	प्रस्तावना	२-३
४	संशोधनाची गरज	४
५	संशोधनाची उद्दिष्टे	४
६	संशोधनाची गृहितके / परिकल्पना	४
७	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	५
८	संशोधन पद्धती	५
९	नमुना निवड - जनसंख्या	५
१०	न्यायदर्श	५
११	संशोधन साधने	६
१२	सांख्यिकीय तंत्र	६
१३	प्रत्यक्ष कार्यवाही	६
१४	तात्पुरती प्रकरण योजना	७
१५	प्रकरण पहिले	७
१६	प्रकरण दुसरे	७
१७	प्रकरण तिसरे	७
१८	प्रकरण चौथे	७
१९	प्रकरण पाचवे	८
२०	ग्रंथसुची	८

लातूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्या : एक अभ्यास

प्रस्तावना :-

"खेड्याकडे चला" असे महात्मा गांधीनी सांगितले होते. कारण भारतातील ७० % लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. या ग्रामीण भागातील लोकांचा विकास झाला तरच भारताचा विकास होईल. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी देशात पंचायती राज व्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्वप्रथम संविधान सभेत चर्चा करण्यात आली व त्यानंतर ०२ ऑक्टोबर १९५२ रोजी समुदाय विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस प्रारंभ केला गेला.

समुदाय विकास कार्यक्रम १९५२ आणि राष्ट्रीय विस्तार सेवा १९५३ यांच्या कामकाजाचे परिक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कामात सुधारणा करण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी भारत सरकारने जानेवारी १९५७ मध्ये एक समिती नियुक्त केली. बलवंतरायजी मेहता हे या समितीचे अध्यक्ष होते. या मेहता समितीने आपला अहवाल नोव्हेंबर १९५७ मध्ये सादर केला. जानेवारी १९५८ मध्ये राष्ट्रीय विकास परिषदेने समितीच्या या शिफारशी स्विकारल्या.

या समितीने त्रिस्तरीय पंचायती राज पद्धती म्हणजे जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालूका स्तरावर पंचायत समिती व ग्रामस्तरावर ग्राम पंचायत अशी पद्धतीची शिफारस यात केली होती. राष्ट्रीय विकास परिषदेने एकाच संरचनेचा आग्रह न धरता स्थानिक परिस्थितीनूसार राज्यांनी त्यांची संरचना विकसित करावी असे ठरले.

पंचायती राज स्थापन करणारे राजस्थान हे पहिले राज्य आहे. या पंचायती राज संबंधी अनेक समित्यांनी आपले अहवाल मांडलेले आहेत. त्यात अशोक मेहता समिती, जी.व्ही.के. राव समिती, एल.एम.सिंघवी समिती, थंगॉन समिती, गाडगीळ समिती इत्यादींनी आपले अभ्यासपूर्ण अहवाल देशासमोर मांडले.

त्यातून ही पंचायती राज व्यवस्था कशा प्रकारे भक्कम होईल हे पाहिले गेले. महाराष्ट्रात मार्च २०१८ च्या अहवालानूसार एकूण ग्रामपंचायतीची संख्या २८००७ एवढी आहे व त्यात लातूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतींची संख्या ७८६ इतकी आहे. या सर्व ग्राम पंचायतींना शासनाकडून वेळोवेळी १३ वा वित्त आयोग, १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोग या सर्व वित्त आयोगाच्या माध्यमातून ब-याच प्रमाणात निधी प्राप्त झालेला आहे.

वर सुचविलेल्या शासकीय निधी व्यतिरिक्त काही ग्रामपंचायतीला विविध माध्यमातून उत्पन्नाचे अनेक स्त्रोत आहेत. उदा :- गाळे भाडे, आठवडी बाजार उत्पन्न, सभागृह व मंगल कार्यालय भाडे, बाग बगीचे, पर्यटन स्थळे, मंदिर, ईत्यादी यांचे उत्पन्न असतात परंतू ग्राम पंचायत स्तरावरील अडचणी मात्र सुटलेल्या पहावयास मिळत नाहीत.

स्थानिक, प्रशासकीय व राजकीय हस्तक्षेपामुळे आणखीही ग्राम स्तरावर स्थानिकांना विशेष सुविधा पुरविल्या जात नाहीत. उदा :- पाणी, दिवाबत्ती, रस्ते, नाले सफाई या मुलभुत सुविधा सुद्धा मिळत नाहीत. संशोधक एक नागरिक या नात्याने या बाबी जवळून पाहत असताना ग्रामपंचायतींना ज्या आर्थिक व सामाजिक समस्या येत असतात त्या समस्येचे सविस्तर अध्ययन व मनातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेअंतर्गत संशोधन करण्याची संधी मिळालेली असल्यामुळे संशोधकानी सदर विषय अभ्यासण्यासाठी हाती घेतलेला आहे.

संशोधनाची गरज :-

१. ग्राम पंचायतींना येणा-या समस्यांचा शोध घेण्यासाठी.
२. ग्राम पंचायतींना उद्‌भवणा-या आर्थिक व सामाजिक समस्या विषयक उपाययोजना करणे.
३. ग्राम पंचायतींशी संबंधित सर्व घटकांना आपली जबाबदारी व कर्तव्य समजण्यास मदत होईल.
४. ग्राम पंचायत प्रशासन व निवडून आलेले प्रतिनिधी यांच्यात समन्वय निर्माण होईल.
५. ग्राम पंचायतीचे उत्पन्नाचे स्त्रोत जाणून घेणे.
६. ग्राम पंचायतीच्या महसुल विषयक समस्या जाणून घेणे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. ग्राम पंचायत स्तरावर येणा-या आर्थिक व सामाजिक समस्यांचा शोध घेणे
२. लातूर जिल्हा अंतर्गत येणा-या ग्राम पंचायतींना मिळणा-या निधीचा अभ्यास करणे
३. लातूर जिल्हा अंतर्गत ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे स्त्रोत अभ्यासणे
४. लातूर जिल्हा अंतर्गत ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्याविषयी उपाययोजना करणे

संशोधनाची गृहितके / परिकल्पना :-

१. ग्राम पंचायत स्तरावर आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत कमी असल्याचे दिसून येते.
२. ग्राम पंचायतींना महसूल विषयक विविध अडचणी असल्याचे दिसून येते.
३. ग्राम पंचायतीच्या विकासासाठी शासकीय योजना अपू-या पडतात असे लक्षात येते.
४. ग्राम पंचायत विकासामध्ये शासकीय नियमांचा अडथळा होत असल्याचे दिसून येते.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

१. क्षेत्र व्याप्ती व मर्यादा :- प्रस्तूत संशोधनाच्या क्षेत्र व्याप्तीमध्ये महाराष्ट्रातील जिल्ह्यांपैकी केवळ लातूर जिल्ह्यांतर्गत येणा-या अहमदपूर, औसा, लातूर, निलंगा, उदगीर, रेणापूर, चाकूर, जळकोट, देवणी, शिरूर अनंतपाळ या दहा तालुक्यांचा समावेश होतो त्यातील निवडक ग्राम पंचायतींच्या समस्यांच्या अभ्यासापूरतेच मर्यादित आहे.

२. आशय व्याप्ती व मर्यादा :- सदरील संशोधनाची आशय व्याप्ती लातूर जिल्ह्यातील निवडक ग्रामपंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्यांपुरतीच मर्यादित आहे.

३. घटक व्याप्ती व मर्यादा :- प्रस्तूत संशोधनाच्या घटक व्याप्तीमध्ये लातूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्येच्या अनुषंगाने सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या भुमिका या घटकांचा समावेश होतो.

संशोधन पद्धती :-

प्रस्तूत संशोधन लातूर जिल्हा अंतर्गत येणा-या ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्या हा विषय असल्याने सदर संशोधन हे वर्तमानकालीन आर्थिक व सामाजिक अडचणींचा, विनीयोगाचा अभ्यास करणारे असल्याने संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्याचे योजिले आहे.

नमुना निवड :-

जनसंख्या :- प्रस्तूत संशोधन कार्य हे लातूर जिल्हा अंतर्गत येणा-या दहा तालुक्यातील ७८६ ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्यांशी संबंधित आहे. त्यामुळे ७८६ ग्राम पंचायती ही प्रस्तूत संशोधनाची जनसंख्या असे.

न्यायदर्श :-

प्रस्तूत संशोधन कार्यासाठी पुढीलप्रमाणे न्यायदर्श म्हणून जिल्हा अंतर्गत १५ % ग्राम पंचायतीची निवड करण्याचे योजिले आहे.

ग्राम पंचायतीची निवड :- स्तरीय न्यायदर्श पद्धती व लॉटरी पद्धती

ग्राम पंचायत सरपंच, उपसरपंच निवड :- यादृच्छिक न्यायदर्श पद्धती

ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामसेवकाची निवड :- प्रासंगिक न्यायदर्श पद्धती

संशोधन साधने :-

प्राथमिक स्त्रोत :- प्रस्तूत संशोधन कार्य हे लातूर जिल्हा अंतर्गत येणा-या ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करणारे असल्याने ग्राम पंचायत सरपंच/उपसरपंच प्रश्नावली व ग्रामसेवक प्रश्नावली या साधनांच्या सहाय्याने माहिती संकलित करण्याचे योजिले आहे.

दुय्यम स्त्रोत :- तथ्य संकलित करण्यासाठी दुय्यम आधार सामग्री म्हणून शासकीय दस्तऐवज, विविध योजनांचा अहवाल व ग्राम पंचायतीच्या कामाशी संबंधित दस्तऐवज व कागदपत्रे यांचा विचार करण्याचे योजिले आहे.

सांख्यिकीय तंत्र :-

प्रस्तूत संशोधन कार्यांतर्गत संकलित माहितीचा अर्थ लावण्यासाठी शेकडेवारी व सरासरी या सांख्यिकी तंत्राचा उपयोग करण्याचे योजिले आहे.

प्रत्यक्ष कार्यवाही :-

प्रस्तूत संशोधन शिर्षकांतर्गत संशोधकाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

↓

संशोधन पद्धतीची निवड - सर्वेक्षण पद्धती

↓

माहिती संकलनाची साधन निर्मिती - प्रश्नावली

↓

जनसंख्या न्यायदर्शन - लातूर जिल्ह्यातील दहा तालूके

↓

प्रत्यक्ष साधनाचा वापर

↓

माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन

↓

संबंधित विभागासाठी शिफारशी

तात्पुरती प्रकरण योजना :-

प्रस्तूत संशोधन हे एकूण पाच प्रकरणात विभागले गेले आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना :-

या प्रकरणात संशोधक लातूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतींची स्थिती त्याचा इतिहास तसेच ग्राम पंचायतींना मिळणारा निधी, ग्राम पंचायतीची सद्यस्थिती, शासनाच्या विविध योजना तसेच ग्राम पंचायतींना उद्भवणा-या आर्थिक व सामाजिक समस्या याचे यात विश्लेषण केले जाईल.

तसेच संशोधन पद्धती, संशोधनाच्या पार्श्वभुमी अभ्यासाबरोबरच संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आवश्यक तथ्यांसह स्पष्ट केल्या जातील.

प्रकरण दुसरे :- संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा :-

या अध्ययनात वर्तमान संशोधन विषयाच्या दृष्टीकोनातून अभ्यासाच्या संबंधित क्षेत्रातील साहित्याचे पूनरावलोकन समाविष्ट केले जाईल. ग्राम पंचायतींना उद्भवणा-या आर्थिक व सामाजिक समस्या यांचा अभ्यास केला असेल असे संशोधन साहित्याचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे :- शासकीय योजना, विविध शासकीय निधी

ग्राम पंचायतींना विविध विकास कामे करण्यासाठी जो शासनाकडून निधी मिळत असतो तो त्याचा या प्रकरणात सविस्तर अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे :- प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

लातूर जिल्ह्यातील विविध ग्राम पंचायतींच्या समस्येच्या संदर्भात. लातूर जिल्ह्यातील निवडलेल्या ग्राम पंचायतींकडून गोळा केलेल्या तथ्यांचे विश्लेषण आणि अर्थ लावून ग्राम पंचायतींना उद्भवणा-या समस्या याचे अध्ययन यात केले गेले आहे.संशोधकाद्वारे परिकल्पना/ गृहितके तपासले जातात व संबंधित दुय्यम तथ्यांचे समर्थन केले जाईल.

प्रकरण पाचवे :- निष्कर्ष आणि शिफारशी

सध्याच्या ग्राम पंचायतीच्या आर्थिक व सामाजिक समस्या संबंधित प्राथमिक आणि दुय्यम माहितीचे विश्लेषण केल्यानंतर काढलेल्या निष्कर्षाचा समावेश असेल. शिवाय त्यानूसार महत्वपूर्ण शिफारशी पूढे मांडल्या जातील.

ग्रंथसूची :-

१. एम.लक्ष्मीकांत, (२०१७), 'इंडियन पॉलिटी'-के.सागर पब्लिकेशन, पूणे.

२. किशोर लवटे, (२०१८), 'पंचायत राज' -ज्ञानदीप प्रिंटर्स, पूणे.

३. Hannan S.K. Abdul, (10 July 2017), 'Study of the financial problems of selected gram panchayat's in the district of 24 parganas north west bengal'

संशोधक

नरेंद्र रमाकांत चोले

मार्गदर्शक

डॉ.पी.डी.शेळके

सहाय्यक प्राध्यापक, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि. लातूर

Research Supervisor
Dr. P. D. Shelke
Dept. of Commerce
SHIVAJI MAHAVIDHYALAYA
Renapur, Dist. Latur